# BDC LIBRARY

## New Paper Clipping

## A.Y. 2023-202

# विद्यार्थ्यांनी श्रमदानातून साकारले वनराई बंधारे

शहर प्रतिनिधी

पाटण

पाणी आडवा, पाणी जिरवा या जीवसृष्टीच्या रक्षणासाठीच्या कल्पनेतून पिंपळोशी, कोयना भागातील गोकुळ येथे पाच ठिकाणी असलेल्या डोंगर उतारावर राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, प्राध्यापक, एन.जी.ओ. व ग्रामस्थ यांच्या मदतीने श्रमदानातून वनराई बंधारे बांधण्यात येत आहेत. या वनराई बंधाऱ्यामुळे पाटण तालुक्याच्या डोंगराळ भागात अनेक ठिकाणी भूजल पातळीत वाढ होण्यास मदत होणार आहे यामुळे या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.



पिंपळोशी : वनराई बंधारे बांधताना प्राध्यापक व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी.

बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण एन.एस.एस. विभाग व पिंपळोशी ग्रामपंचायत तसेच कोयना भागातील एन.जी.ओ. यांच्या माध्यमातून गोकुळ याठिकाणी एन.एस.एस. चे स्वयंसेवक व प्राध्यापक तसेच ग्रामस्थांनी एकत्रितपणे पिंपळोशी येथील नदीवर दोन बंधारे बांधण्यात आले. तसेच गावात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

गोकुळ जवळच असलेल्या डोंगर उतारावर पाणी अडवा, पाणी जिरवा या संकल्पनेचा पुरेपूर प्रत्यक्षात उपयोग करण्यासाठी छोटे छोटे मातीचे जवळपास तीस फुट लांब व चार फुट रुंद बंधारे बांधून पूर्ण केले. पावसाळ्यातील परतीच्या पावसाचे पाणी वनराई बंधाऱ्यामुळे अडवले गेल्याने या पाणीसाठ्याचा भविष्यात उपयोग डोंगर परिसरातील पशुपक्षी, जनावरे निसर्गातील प्रत्येक घटकाला फायदा होईल अशा कल्पनेतून हे वनराई बंधारे बांधण्यात आले.

श्रमदान राबविण्यासाठी पिंपळोशी ग्रामपंचायत सरपंच विशाल निकम तसेच सर्व पदाधिकारी एन.जी.ओ. चे सुनील काळे, बाळासाहेब देसाई कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रकल्प अधिकारी डॉ. जी. एस. पट्टेबहादूर, कार्यक्रम अधिकारी डॉ. भरत जाधव, ज्युनियर विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. बळीराम लोहार, प्रा. दिनेश रेवडे, प्रा. शेखर फुटाणे पिंपळोशी ग्रामपंचायत पदाधिकारी, प्राध्यापक व राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक यांच्या श्रमदानाच्या माध्यमातून निसर्ग रक्षणासाठी पाच ठिकाणी वनराई बंधारे बांधले आहेत.

यावेळी बाळासाहेब देसाई कॉलेजचे डॉ. संदीप तडाखे, प्रा. विशाल कांबळे, प्रा.श्रीगणेश गायकवाड, प्रा. एल. जी. गपगे, प्रा. एस.डी. कदम, प्रा. आर. के शिर्के, प्रा. सौ. डॉ. एस. एस. कुंभार, प्रा. सौ. शिर्के, प्रा. सौ. टी. आय. पाटणकर व ग्रामस्थ यांनी श्रमदानात सहभाग नोंदविला.